# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २२ मार्च, २०१८ / चैत्र १, १९४० (शके)**

| | |
|---|---|
| (१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री<br>(३) कृषी, फलोत्पादन मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३५**

---

### राज्यातील सागरी सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षक यांचे थकीत मानधन अदा करण्याबाबत

**(१) * ३७९९८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.जयंत पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे, मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी शासनाने सन २०१५ मध्ये ३०५ सुरक्षारक्षकांच्या नेमणूका केल्या असून गत ६ महिन्यांपासून त्यांचे मानधन मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह कोकण किनारपट्टीवरील सुरक्षारक्षक व पर्यवेक्षक यांचे मिळून रुपये ३ कोटी ४७ लाख मानधन थकीत असून या सागरी सुरक्षारक्षकांची जबाबदारी शासनाने मत्स्यव्यवसाय विभागावर सोपविली असून उक्त प्रकरणी मत्स्यव्यवसाय विभाग व मा.मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार करुनही सदर सुरक्षारक्षकांना न्याय मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सागरी सुरक्षारक्षकांचे थकीत मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय. पालघर, ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी एकूण २७३ सुरक्षारक्षक व २३ पर्यवेक्षक नेमण्यात आले आहेत.

(२) होय.

(३) व (४) सागरी सुरक्षारक्षक व पर्यवेक्षक यांना देय असलेले थकित मानधन माहे एप्रिल, २०१८ मध्ये अदा करण्यात येईल.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्याबाबत

**(२) * ३८६६५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ,**

**ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५८८९ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करून शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी, वेतनवाढ देण्याबाबतची मागणी महामंडळातील कर्मचाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री व मा.परिवहन मंत्री यांना भेटून निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी मुंबई येथील आझाद मैदानावर माहे जुलै-ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलने केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी संदर्भात दाखल झालेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचे आदेश दिले होते. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठी गृह विभागाच्या, शासन निर्णय दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ अन्वये उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यानुसार कर्मचाऱ्यांना वेतनवाढ व सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२) व (३) होय.

(४) मा.उच्च न्यायालयाने उच्चस्तरीय समितीचा अहवाल कामगार संघटनांना उपलब्ध करुन दिला, मात्र संघटनांनी सदर अहवाल अमान्य केला.

सद्य:स्थितीत, वेतन सुधारणेचा मुद्दा औद्योगिक न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे प्रलंबित आहे. मान्यताप्राप्त संघटनेने दिनांक ०६/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महामंडळास वाटाघाटी सुरु करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार महामंडळाद्वारे संघटनेबरोबर पुन्हा वाटाघाटी सुरु करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(३) * ३७६३५ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीतील इमारत क्रमांक ७ मधील घर क्रमांक १०५९ येथील छताचा भाग कोसळून ८ वर्षाची मुलगी गंभीर जखमी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील अनेक शासकीय इमारती ह्या ५० वर्ष जुन्या असून इमारती जीर्ण झाल्याने वसाहतीत वारंवार अपघात होत असल्यामुळे रहिवाशांनी याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, वांद्रे यांच्या कार्यालयात लेखी तक्रारी करुनही दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसाहतीची दुरुस्तीची कामे न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून सदर वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) वांद्रे शासकीय वसाहतीतील इमारती सन १९५९ ते १९७५ दरम्यान बांधल्या असल्याने जीर्ण झाल्या असून दुरूस्तीबाबत रहिवाशांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर इमारतींची दुरूस्ती निधीच्या उपलब्धतेनुसार प्राथम्यक्रमाने करण्यात येते. वांद्रे शासकीय वसाहतीतील इमारतींचे सविस्तर स्ट्रक्चरल ऑडीट करुन दुरुस्तीची कामे उपलब्ध निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## पेण, पनवेल व उरण (जि.रायगड) तालुक्यात एसईझेड करीता संपादित केलेल्या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे नोंद करण्याबाबत

**(४) * ३८६७६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण, पनवेल आणि उरण (जि.रायगड) तालुक्यातील ४५ गावांची १० हजार ९४३ हेक्टर जमीन माहे मार्च, २००६ मध्ये मुंबई इंटीग्रेटेड एसईझेड लि. या कंपनीने संपादीत केली व सन २००७ मध्ये खरेदीखत केले असून शेतकऱ्यांना एकरी भाव रुपये १८ लाख ठरविण्यात आला, त्यापैकी त्यांना रूपये १० लाख एकरी भाव देण्यात आला असून उरलेले रुपये ८ लाखांमध्ये पुनर्वसन करण्याचे ठरविलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त प्रत्येक जमीनधारकास त्याचे नामनिर्देशित केलेल्या एका व्यक्तीस प्रशिक्षण आणि नोकरी अथवा रुपये ३ लाख अर्थसहाय्य व प्रशिक्षण कालावधीत भत्ता देण्यात येईल अथवा संपादित केलेल्या जमिनीच्या प्रति एकरी रुपये ५ लाख एकाच वेळचे अर्थसहाय्य देण्यात येईल अथवा प्रकल्पग्रस्त कुटुंबास कायमस्वरुपी दरमहा रुपये ५ हजार ते १० हजार निर्वाह भत्ता देण्यात येईल अशा विविध योजना कंपनीने सादर केल्या होत्या, परंतु या गोष्टी न देता परस्पर ७/१२ मुंबई एसईझेड च्या नांवावर करुन शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ४५ गावांतील कंपनीने घेतलेली जमीन मिळकतीच्या ७/१२ वरील इतर हक्कामधील “भूसंपादनात समाविष्टचा” शेरा महाराष्ट्र शासनाने काढून टाकण्याचे आदेश दिलेले असूनही मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) रद्द झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर शेतकऱ्यांची कंपनीने घेतलेली जमीन शेतकऱ्यांच्या नावावर करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील उरण, पेण व पनवेल तालुक्यांतील ४५ गावांतील ८२५७-७९-३५ हे.आर जमीन एसईझेड करिता संपादन करण्यासाठी भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ४ ची प्राथमिक अधिसूचना सन २००६ मध्ये प्रसिध्द झाली. त्यानंतर सन २००७ मध्ये ८१३४-९७-९१ हे.आर जमीन संपादनाकरिता कलम ६ ची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. उपरोक्त जमिनीपैकी एकूण ३११३ प्रकरणी भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ११ (२) अन्वये संमतीदर्शक निवाडे जाहीर होऊन त्या निवाड्यांद्वारे १५०४-९१-३४ हे.आर जमीन संपादन करण्यात आलेली आहे व सदर जमिनीचा ताबा महामुंबई सेझ (एस.ई.झेड.) कडे देण्यात आला आहे. उर्वरित जमीन भूसंपादनाच्या प्रक्रियेतून वगळण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी जमीन मालक व रिलायन्स कंपनी यांच्यासोबत संमतीदर्शक निवाडे करून एकरी १० लाख रुपये असा भाव ठरविण्यात आला होता.

(२), (३) व (४) कंपनीकडून प्रश्नाधीन सुविधा सदर प्रकल्प अंमलात आल्यानंतर पुरविण्यात येणार होत्या तसेच पॅकेजनुसार योग्य ते अर्थसहाय्य देण्यात येणार होते. परंतु आर्थिक मंदीमुळे सदर प्रकल्प अंमलात आलेला नाही.

सदर प्रकरणी शासनाच्या दिनांक १८/२/२०११ च्या पत्रान्वये संमतीदर्शक निवाड्यांद्वारे संपादित क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्राबाबत कलम ६ च्या अधिसूचनेनंतर विहित मुदतीत संमती निवाडे जाहीर न झाल्याने त्या क्षेत्रावरील भूसंपादनाची कार्यवाही व्यपगत झाली असल्यामुळे अशा क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्कातील भूसंपादनाचे शेरे काढून टाकण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पेण तालुक्यातील एकूण ७ गावांतील एकूण २६२-१६-९१ हे.आर क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे कमी करण्यात आले असून उर्वरित १७ गावांच्या ७/१२ वर नोंदी न ठेवल्यामुळे इतर हक्कातील शेरा कमी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उरण तालुक्यातील २० गावांतील ३५९३.६७.६ हे.आर क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे कमी करण्यात आले आहेत. तसेच पनवेल तालुक्यातील १ गावाच्या ८६.६८.० हे.आर क्षेत्राच्या ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे कमी करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे गंगावाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे ७/१२ उतारा मिळणेबाबत

**(५) * ३७८५१ श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गंगावाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकऱ्यांना संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडून त्यांचे ७/१२ उतारे मिळत नसून मदन रामभाऊ यादव यांना त्यांची गंगावाडी शिवारातील राहेरी सज्जाच्या अधिनस्त गट क्र. ३१५ मध्ये जमीन असतानाही केवळ महसूली अभिलेख्यात गट क्र. ३१५ चे पान नसल्याने ७/१२ उतारा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना लेखी निवेदन दिल्यानंतर जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी उपविभागीय अधिकारी, बीड व तहसिलदार, गेवराई यांना उक्त प्रकरणी कार्यवाही करून अहवाल सदर

करणेबाबत निर्देशित केले असता संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा ७/१२ उतारा मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे गंगावाडी, ता.गेवराई येथील रहिवासी श्री.मदन रामभाऊ यादव यांची जमीन गंगावाडी शिवारातील राहेरी तलाठी सज्जाच्या अधिनस्त गट नं. ३१५ मध्ये असून तलाठी सज्जातील दस्ताऐवजामध्ये गट नं. ३१५ चे पान नसल्यामुळे त्यांना ७/१२ चा उतारा मिळत नाही, अशा स्वरुपाचे दिनांक २२/१२/२०१६ चे निवेदन सन्माननीय लोकप्रतिनिधी यांनी दिले आहे. त्यानुसार श्री.मदन रामभाऊ यादव यांचा प्राप्त अर्ज व लोकप्रतिनिधींच्या लेखी निवेदनास अनुसरुन जिल्हाधिकारी, बीड यांनी उपविभागीय अधिकारी, बीड व तहसिलदार, गेवराई यांना दिनांक १७/०३/२०१७ च्या पत्रान्वये कार्यवाही करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार सदरील प्रकरण उपअधिक्षक, भूमि अभिलेख, गेवराई यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने तहसिलदार, गेवराई यांनी गट क्र. ३१५ चा गा.न.नं. ७/१२ तयार करण्याची कार्यवाही करण्याबाबत त्यांना कळविले होते. त्यावर उपअधिक्षक, भूमि अभिलेख, गेवराई यांनी सदर गट क्र. ३१५ एकत्रिकरण योजनेच्या वेळेस चुकीने पडला गेल्यामुळे सदर गट क्र. ३१५ बाबत त्यांचे कार्यालयामार्फत कोणतीही दुरुस्ती करता येत नाही असे कळविले आहे.

त्यानुसार सदर प्रकरणी नियमानुसार एकत्रिकरणापूर्वीचे व एकत्रिकरणानंतरचे सर्व अधिकार अभिलेख गाव नमूना क्र. ७/१२ उतारे जोडून दुरुस्ती करावयाची झाल्यास एकत्रिकरण तक्रारी अर्ज उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे दाखल करणे आवश्यक आहे.

अर्जदार श्री.मदन रामभाऊ यादव यांचा अर्ज उचित कार्यवाहीस्तव उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्याबाबत तहसिलदार, गेवराई यांना सुचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील अनेक गटांच्या ७/१२ वरील क्षेत्र आणि प्रत्यक्षातील क्षेत्र यात तफावत असल्याबाबत

**(६) * ३८७७६ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने ई-फेरफाराची अंमलबजावणी केली असता या संगणकीकृत ७/१२ च्या तपासणीत पुणे जिल्हयातील ४५ हजारापेक्षा जास्त गटांच्या ७/१२ वरील क्षेत्र आणि प्रत्यक्षातील क्षेत्र यात मोठी तफावत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मूळ ७/१२ मध्ये फेरफार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) पुणे जिल्हयातील अनेक गटांच्या गा.न.नं. ७/१२ वरील क्षेत्र आणि त्यातील भोगवटादारांच्या नावासमोर लिहिण्यात आलेल्या क्षेत्राची बेरीज या मध्ये तफावत आढळते, ही बाब खरी आहे. सदरच्या चुका या गा.न.नं. ७/१२ चे पोटहिस्से पाडताना, कमी जास्त पत्रके तयार करताना, गा.न.नं. ७/१२ पुनर्लेखन/प्रख्यापन करताना व मंजूर फेरफार अंमल घेताना हस्तदोषामुळे होऊ शकतात. पुणे जिल्हयात चावडी वाचनादरम्यान निदर्शनास आलेल्या गा.न.नं. ७/१२ संगणकीकरणातील तफावती दुरुस्त करुन गा.न.नं. ७/१२ अद्‌यावत करण्याचे काम सुरु आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १५५ व २५७ अन्वये अशा चूका दुरुस्त करण्याविषयी कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

-----------------

## पेठ-नाशिक-येवला-औरंगाबाद या चौपदरी रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(७) * ३९३१५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८७९ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ-नाशिक-येवला-औरंगाबाद प्र.रा.मा.क्र. २ चौपदरी रस्ता कि.मी. १७९/०० ते २२८/४०० या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे सदर रस्त्याची दुरुस्ती व नुतनीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे उक्त प्रस्तावास मंजुरी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रश्नाधीन रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीत दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. काम निधीच्या उपलब्धततेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे. रस्त्यावरुन वाहतुक सुरळीतपणे चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समुद्रात माश्यांच्या प्रजाती नष्ट झाल्याबाबत

**(८) * ४००८७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिमासेमारीमुळे माश्यांची पिल्ले जाळ्यात सापडणे, ट्रॉलरमुळे समुद्राचा तळ खरवडून मासेमारीमुळे माश्यांचे खाद्य नष्ट होणे, प्लास्टीकच्या घातक वस्तु, रसायने, ओल्या कचऱ्यातील जंतुमुळे पाण्यातील प्राणवायुवर होणारा परिणाम, यामुळे राज्यातील पापलेट, बोंबील, कोळंबी, मोरी, झींगा शेवंड (लॉब्स्टर) इ. माश्यांच्या प्रजाती नष्ट होत असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे, खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुद्रांक विक्रेते व दस्तलेखक संघटनेच्या मागण्यांबाबत

**(९) * ४०३०८ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७५६ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने e-SBTR द्वारे ऑनलाईन मुद्रांक शुल्क भरण्यासाठीची किमान मर्यादा रुपये १००/- इतकी निश्चित केली असून रुपये ५००/- च्या अभिधानापेक्षा अधिक किंमतीच्या कागदी मुद्रांकाची छपाई व वितरण राज्यात कायमस्वरुपी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रिटीशकालापासून राज्यात अस्तित्वात असलेली मुद्रांक विक्रीची प्रथा बंद करण्यात येवू नये, म्हणून शासन मान्य मुद्रांक विक्रेते व दस्तलेखक संघटनेकडून शासनास त्यांच्या मागण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संघटनेच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनुसार राज्यातील मुद्रांक विक्रेत्यांना मुद्रांक विक्रीपोटी देण्यात येणाऱ्या कमिशनमध्ये वाढ करता येईल काय, याबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करून उचित निर्णय घेण्याचे प्रस्तावित होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासन मान्य मुद्रांक विक्रेते व दस्तलेखक संघटनेने केलेल्या मागण्याबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन मान्य मुद्रांक विक्रेते व दस्तलेखक संघटनेकडून शासनास त्यांच्या मागण्यांसंदर्भात निवेदन देण्यात आले आहे हे खरे आहे.

(३) व (४) उक्त संघटनेच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनुसार राज्यातील मुद्रांक विक्रेत्यांना मुद्रांक विक्रीपोटी देण्यात येणाऱ्या कमिशनमध्ये वाढ करता येईल काय ? याबाबत वित्त विभागाच्या सल्ल्याने उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे. त्यानुषंगाने वित्त विभागाशी विचारविनिमय सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिलीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) गावातील ओढ्याच्या हद्दीत अतिक्रमण केल्याबाबत

**(१०) * ४०४११ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिलीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) गावातील अनेकांनी ओढ्याच्या हद्दीत अतिक्रमण करुन विहिरी खोदल्या असून विहिरींचा निघालेला उपसा ओढ्यातच टाकला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोंदणीनुसार साडेतीनशे फूट रुंदी असणाऱ्या ओढ्याची रुंदी सध्या फक्त तीस ते चाळीस फूट असल्याने पावसाळयात ओढ्याला जर जास्त पाणी आले तर अनेकांचे जीवन धोक्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील** : (१) होय. १५ विहिरींपैकी एक विहीर अतिक्रमित जमिनीवर असून इतर विहिरी संबंधित शेतकऱ्यांच्या क्षेत्रात असल्याचे सकृतदर्शनी दिसते.

(२) ओढ्याची मूळ नकाशानुसार रुंदी किती आहे याबाबत उपअधिक्षक भूमी अभिलेख माळशिरस यांचेकडून मोजणी करून हद्दीखुणा निश्चित करणे आवश्यक आहे. तथापि, सध्या ओढ्याची रुंदी ही ८० ते १०० फूट असल्याने पावसाळ्यात जर ओढ्याला जास्त पाणी आले तर जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता नाही.

(३) व (४) विषयांकित ओढ्याच्या नकाशावरील रुंदीच्या हद्दीच्या खुणा उपअधिक्षक भूमी अभिलेख, माळशिरस यांचेकडून निश्चित करून घेऊन अतिक्रमित ओढ्याचे क्षेत्र खुले करण्याची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मदतीने करण्याचे जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेस्तरावर संकल्पित आहे.

-----------------

## हिमायतनगर (जि.नांदेड) येथील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे थकित अनुदान देण्याबाबत

**(११) * ४०४४६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग घेतला नसलेल्या शेतकऱ्यांना ५० टक्के सोयाबीन नुकसानीचे अनुदान शासनाने जाहीर केले असून हिमायतनगर (जि.नांदेड) येथील तहसिलदारांच्या दत्पर दिरंगाईमुळे गत वर्षापासून येथील सोयाबीन उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे थकित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ मधील अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना पीक नुकसानीवर मदत जाहीर करण्याचा निर्णय, शासन निर्णय दिनांक ०९/०१/२०१७ अन्वये घेण्यात आला असून, सदर शासन निर्णयान्वये ज्या शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पीक विमा काढलेला आहे, अशा शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रक्कमेच्या ५०% रक्कम प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी नसलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत म्हणून देण्यात येईल असा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद व अमरावती यांच्याकडून निधी मागणीबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले असून ते तपासण्यात येत आहेत. उर्वरित विभागांकडून निधी मागणीबाबतचे प्रस्ताव प्राप्त होताच

माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना पीक नुकसानीवर मदत जाहीर करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे पानीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील देवस्थानच्या जमिनी वहिवाटदारांनी बेकायदेशीररित्या विक्री केल्याबाबत

**(१२) * ४०४४९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३४२ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील देवस्थानच्या जमिनी वहिवाटदारांच्या नांवे करण्याबाबत मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखालील समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने देवस्थान जमिनीसंदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकामी दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी प्रधान सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखालील अभ्यास समिती गठीत केली असून सदर अभ्यास समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे पानीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील सर्व्हे नं. १३९/१, १४४/१अ, (गट क्रमांक ५४०, ५४२, ४१९ व ४२०) १३९/१ब, १४४/१ब, १३९/२, १४३/२, १४४/२, १३९, १४३/३, १४४/३ मधील नरहरी देवस्थानच्या जमिनी वहिवाटदारांनी परस्पर बेकायदेशीर विकल्या असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर देवस्थान जमिनीच्या बेकायदेशीर हस्तांतरणाप्रकरणी संबंधित वहिवाटदारांविरुध्द कारवाई करुन जमिनी पूर्ववत देवस्थानचे नांवे करण्याबाबत तेथील भाविक ग्रामस्थांनी मा.महसूल मंत्री, विभागीय आयुक्त, पुणे व जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे तक्रार/निवेदन सादर केली असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राप्त निवेदनाचे अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) राज्यातील देवस्थान जमिनी यांच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता, याबाबत सर्वंकष अभ्यास करून शासनास योग्य शिफारशी करण्याकरीता शासन निर्णय दिनांक २३/०३/२०१६ अन्वये प्र.स. (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे. सदर समितीकडून या विषयांबाबतचा सर्वंकष अभ्यास सुरू असून, त्याबाबतचा समितीचा अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.
(२), (३) व (४) मौजे पानीव, ता.माळशिरस, जि.सोलापूर येथील (सर्व्हे नं.१३९/१अ, १४३/१अ, १४४/१अ तसेच सर्व्हे नं.१३९, १३९/१ब, १४४/१ब, १३९/२, १४३/२, १४३/३, १४४/२, १४४/३) देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण झाले असल्यामुळे सदर जमीन पुर्ववत देवस्थानच्या नावे व्हावी, अशा आशयाचे दिनांक २६/१२/२०१७ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, सोलापूर आणि तहसिलदार, माळशिरस यांना प्राप्त झाले आहे. तहसिलदार, माळशिरस यांनी प्राप्त निवेदनाबाबत, अर्जदार यांना या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, माळशिरस यांचेस्तरावर अर्धन्यायिक कामकाज चालु असल्याचे दिनांक १८/०१/२०१८ रोजी कळविले आहे.

सबब, सदरहू ठिकाणी काही जमिनीचे विनापरवानगी हस्तांतरण झाले असल्याचे यापुर्वीच निदर्शनास आल्याने, शासन परिपत्रक दिनांक ३०/०७/२०१० अन्वये दिलेल्या दिशानिर्देशाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, माळशिरस यांनी सदर प्रकरण महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २५७ अन्वये अर्धन्यायिक अधिकारात पुनर्रिक्षणात दाखल करून घेतले आहे. सदर प्रकरणाधीन जमिनी देवस्थानच्या नावे पूर्ववत करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, माळशिरस यांचेस्तरावर अर्धन्यायिक कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्याबाबत

**(१३) * ४०५८२ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात पूरसदृश्यस्थिती निर्माण होणे, इमारत कोसळणे, आग लागणे तसेच आकस्मिकरित्या अपघात होणे अशा विविध प्रकारच्या घटना वारंवार घडत असून अशी अचानक उद्‌भवलेली परिस्थिती हाताळण्यासाठी मुंबईत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ मधील आपत्ती व्यवस्थापन कायदयाची अंमलबजावणी गेल्या १३ वर्षापासून शासनाने अद्‌याप केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त कायदयाची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने व मुंबईत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) शासन निर्णय क्रमांक आव्यप्र-२०१०/प्र.क्र.११७/ आव्यप्र-१ दिनांक १९ जानेवारी, २०११ अन्वये बृहन्मुंबईकरिता आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना महाराष्ट्र शासनामार्फत करण्यात आलेली आहे. ज्याचे अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त हे आहेत.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## संगमेश्वर-देवरूख-साखरपा (जि.रत्नागिरी) या राज्यमार्गाच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाची कामे करण्याबाबत

**(१४) * ४०८६२ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर-देवरूख-साखरपा ह्या ३४ कि.मी. अंतराचा प्रमुख राज्यमार्ग हा साखरपा तिठा येथे रत्नागिरी-कोल्हापूर-नागपूर महामार्गाला तर सोनवी तिठा येथे तो मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ (पूर्वीचा रा.महा.क्र. १७) जोडला जात असून या संपूर्ण मार्गाच्या रूंदीकरण व मजबुतीकरणासाठी माहे एप्रिल, २०१६ मध्ये विशेष योजनेतून रुपये ३२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगमेश्वर-देवरूख-साखरपा या राज्यमार्गाच्या रूंदीकरण व मजबुतीकरणासाठी रुपये ३२ कोटींचा निधी मंजूर होवून अद्यापपर्यंत सदरहू रस्त्याच्या रूंदीकरण व मजबुतीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रमुख राज्यमार्गाच्या रूंदीकरण व मजबुतीकरणाचे कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, खरे आहे.

प्रस्तुत कामास शासनाने रुपये ३२ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. काम अर्थसंकल्पात समाविष्ट आहे.

(२), (३) व (४) कामाच्या निविदा बोलविण्यात आल्या आहेत. निविदा निश्चिती करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मौजे सत्पाळा (ता.वसई, जि.पालघर) येथील शासकीय जमीन भूमाफियांनी बळकाविल्याबाबत

**(१५) * ४०९३१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील पश्चिम किनारपट्टीलगत असलेल्या गाव मौजे सत्पाळा येथील खारजमीन असलेला साडेतीन एकर शासकीय भूखंड भूमाफियांनी बळकाविल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खार जमिनीवर अनधिकृतरित्या भरतीचे पाणी अडविण्यासाठी बंधारे टाकून तर काही ठिकाणी मातीचा भराव केल्यामुळे भरतीचे पाणी शेतजमिनीत शिरल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी क्षारयुक्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळ्यात पाण्याचा नैसर्गिक निचरा होण्याचा मार्ग बंद झाल्यामुळे पावसाळ्यात आदिवासी पाडे पुराच्या पाण्याखाली जाण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अनधिकृत बंधारे निष्कासित करुन सदर भूखंड ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे सत्पाळा, ता.वसई जि.पालघर येथील नवीन भूमापन क्र. १३६ मधील क्षेत्र १-३४.० हे-आर ही खांजण जमीन भूमाफियांनी गिळंकृत केल्याबाबतची तक्रार, माजी उपसभापती पंचायत समिती, वसई यांनी दिनांक ३०/०१/२०१८ च्या पत्रान्वये तलाठी, साझा वटार-सत्पाळा यांचेकडे केली आहे. त्यानुषंगाने तहसिलदार, वसई यांनी दिनांक ०१/०३/२०१८ अन्वये स.नं. १३६/१ या खांजण जमिनीलगत स.नं. १९०/अ व १९०/२/१ पै या खाजगी जमिनी असून सदर जमीनधारकांनी शेतजमिनीत खारेपाणी येऊ नये म्हणून बांधबंधिस्ती केली आहे. तथापि, सदर जागेवर बंधारा बांधलेला नाही. तसेच सदर ठिकाणी असलेला आदिवासी

एकतापाडा हा समुद्रापासून सुमारे ०२ कि.मी. अंतरावर असून पावसाळ्यामध्ये पूरस्थितीत आदिवासी पाड्यामध्ये पाणी शिरत असते, मात्र शेत जमिनीत खारे पाणी येऊ नये यासाठी बांधबंधिस्ती केली असल्याने आदिवासी पाडे पाण्याखाली जाण्याची बाब दिसून येत नाही. वसई गावातील खारजमिनीचे संरक्षणासाठी वठार खारभूमी योजना कार्यान्वित असून योजनेच्या पुन:प्रापित क्षेत्रात सत्पाळा व वठार गावातील ९१ हे.आर क्षेत्राचा समावेश असून सदर योजनेमुळे खारे पाणी शिरुन जमीन क्षारयुक्त होत नाही. बांधबंदिस्ती केलेली जागा शासकीय खांजण आहे किंवा कसे याबाबत उपअधिक्षक, भूमी अभिलेख, वसई यांना मोजणी करणेबाबत तहसिलदार, वसई यांनी दिनांक २३/०२/२०१८ च्या पत्रान्वये कळविले असून मोजणीअंती पुढील कार्यवाही करणेचे संकल्पित आहे.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील उत्कर्ष गृहनिर्माण संस्थेच्या भूखंड गैरव्यवहाराबाबत

**(१६) * ४०९४६ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उत्कर्ष गृहनिर्माण या संस्थेला प्रत्येकी २०० वाराचे २० भूखंड वितरीत करण्यात आले परंतु काहि भूखंडधारकांनी शासनाची कोणतीही परवानगी नसताना एक पेक्षा अधिक व्यक्तींना हस्तांतरीत करुन रुपयांचा महसूल बुडविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या प्रकरणात दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे वडवली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील डी. डी. स्कीम १५ मधील भूखंड क्रमांक २६७ ते २८५ व २९९, क्षेत्र ६२६७.०० चौ.वार ही जमीन अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक

२७/११/१९६९ च्या आदेशान्वये नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांच्या निवासी प्रयोजनाकरीता काही अटी व शर्तींवर मंजूर करण्यात आली आहे. सदर संस्थेच्या काही सभासदांनी विनापरवानगी त्यांच्या भूखंडाचे हस्तांतरण करुन शर्तभंग केला असून सदर शर्तभंग शासन निर्णय दिनांक १३/०४/२०१७ मधील तरतूदीनुसार नियमानुकूल करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यास्तरावर सुरु आहे.

-----------------

## कामठी (नझुल) (जि.नागपूर) येथील जमीन रहिवासी प्रयोजनार्थ मंजूर करण्याबाबत

**(१७) * ४०९५४ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी (नझुल) (जि.नागपूर) शिट क्र. १, सवंर्ग क्र. ३ क्षेत्रफळ १११.६३ चौ.मी. रहिवासी प्रयोजनार्थ मंजूर करण्याकरीता विनंती अर्ज नायब तहसिलदार, कामठी (नझुल) येथे सन २०१३ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महसूल विभागातील कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) श्री.अब्दुल मजीद या व्यक्तीने त्यांच्या ताब्यात असलेली मौजा कामठी शिट क्र.१, ब्लॉक क्र.२ क्षेत्र १११.६३ चौ.मी. नझूल जमीन रहिवासी प्रयोजनाकरीता मंजूर करण्याबाबत नायब तहसिलदार, कामठी यांच्याकडे दिनांक १३/०६/२०१३ रोजी अर्ज केला होता त्यानुषंगाने नायब तहसिलदार (नझुल) कामठी यांनी संबंधित कार्यालयांचे अभिप्राय मागविले होते.

उक्त जागा जुने विकास आराखडयानुसार खेळाच्या मैदानाकरीता आरक्षित आहे. तसेच नविन प्रारुप विकास आराखड्यामध्ये खेळाचे मैदानाकरिता आरक्षित दर्शविण्यात आली आहे. उक्त जागा रहिवासी प्रयोजनार्थ देता येत नाही, असे अभिप्राय मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांनी दिनांक ०१/०३/२०१८ च्या पत्रान्वये दिले आहेत. त्यामुळे उक्त जागेबाबतचे प्रकरण नायब तहसिलदार (नझुल) कामठी यांचे कार्यालयाद्वारे नस्तीबंद करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील पशुधन विकास अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) * ४०९६१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात पशुसंवर्धन विभागात एकूण १३४ पशुधन विकास अधिकारी पदे मंजूर असून यापैकी ४२ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरणेसाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) सोलापूर जिल्हयात पशुधन विकास अधिकारी यांची एकूण १४४ पदे मंजूर असून त्यापैकी ९६ भरलेली व ४८ रिक्त आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पशुधन विकास अधिकारी या संवर्गाच्या सन २०१८ च्या नियतकालिक बदल्या, सरळसेवा भरती व पदोन्नती इत्यादी मार्गाने पदे भरताना, पदांच्या उपलब्धतेनुसार सोलापूर जिल्हयातील पशुधन विकास अधिकारी या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात

येईल. सद्य:स्थितीत रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून पशुपालकधारक शेतकऱ्यांच्या जनावरांना वैदयकीय सेवासुविधा पुरविण्यात येत आहेत.

-----------------

## मौजे गुंजाळवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील शेतकऱ्यांच्या जमीन मोजणीच्या कामात विलंब झाल्याबाबत

**(१९) * ४१०१० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुंजाळवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील शेतकऱ्यांनी स्वत:च्या जमिनीची मोजणी करण्यासाठी दिनांक १ मार्च, २०१७ रोजी अर्ज दाखल करुन व मोजणी फी रुपये ३०००/- च्या शासकीय चलनाद्वारे भरणा करुन जुन्नर भूमी अभिलेख कार्यालयाने स्वत: मोजणी न करता दिनांक २४ मे, २०१७ रोजी खाजगी व्यक्ती पाठवून मोजणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोजणीनंतर सुमारे अडीच महिन्याचा कालावधी गेल्यानंतरही हद्द न सांगितल्याप्रकरणी पाठपुरावा केला असता हद्द न दाखविता सदरच्या मोजणीत आपली कोणतीही अतिरिक्त जमीन निघत नाही असे तोंडी सांगून पुन्हा मोजणी करावयाची असल्यास रुपये ९,०००/- च्या भरणा करण्यास सांगितल्याप्रमाणे दिनांक ३० ऑगस्ट, २०१७ रोजी उक्त रक्कमेचा भरणा करुन दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी मोजणी करण्यात आली परंतू अद्याप हद्द दाखविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी व्यक्तींकडून मोजणी करण्याची कारणे काय आहेत तसेच संबंधित शेतकऱ्यांना जादा रकमेचा भुर्दंड दिल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करुन शेतीची हद्द दाखविण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) जुन्नर भूमी अभिलेख कार्यालयाने स्वत: मोजणी न करता खाजगी व्यक्ती पाठवून मोजणी केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) मौजे गुंजाळवाडी, ता.जुन्नर, जि.पुणे येथील गट नं. ११९० च्या हद्दकायम मोजणीसाठी अर्जदार श्री.बाळु ठकाजी शिंदे यांनी दिनांक ०१/०३/२०१७ रोजी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, जुन्नर कार्यालयाकडे मोजणी अर्ज सादर केला. त्या संदर्भात अतितातडी मोजणी फी रुपये ३०००/- भरणा केल्यानंतर त्यास अतितातडी हद्द कायम मो.र.नं. ७५५५/१७ देण्यात आला. सदर प्रकरणी परिरक्षण भूमापक, आळेफाटा यांनी सर्व संबंधितांना आगाऊ मुदती नोटीसीने कळवून, दिनांक १८/०५/२०१७ रोजी मोजणी करुन दिनांक २१/०६/२०१७ रोजी हद्दी दाखविलेल्या आहेत. तसेच, सदरच्या हद्दी मान्य असल्याबाबत अर्जदार यांनी जबाबही दिलेला आहे.

तद्नंतर अर्जदार यांनी सदर मोजणीबाबत उपअधिक्षक, भूमि अभिलेख, जुन्नर कार्यालयात तोंडी तक्रार उपस्थित केल्यामुळे त्यांना नियमाप्रमाणे निमताना फी भरण्याबाबत सांगण्यात आले. त्यानुसार अर्जदार यांनी दिनांक ३०/०८/२०१७ रोजी निमताना मोजणी फी रक्कम रुपये ९०००/- भरली असून त्यानुसार उपअधिक्षक, भूमि अभिलेख, जुन्नर यांनी प्रस्तुत निमताना अतितातडी मो.र.नं.७/२०१७ प्रकरणामध्ये दिनांक २८/०९/२०१८ रोजी मोजणी करुन दिनांक ०९/०३/२०१८ रोजी हद्दीच्या खुणा दाखविलेल्या आहेत. तसेच सदरच्या हद्दीच्या खुणा मान्य असल्याबाबत अर्जदार यांनी जबाबही दिलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराकडून नियमानुसार विहित फी आकारुन मोजणी व हद्दी दाखविण्याची कार्यवाही करण्यात आल्याने कोणाविरुध्द कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन अनुदान देण्याबाबत

**(२०) * ४१०२० श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात सन २०१६-१७ मध्ये शेतकऱ्यांनी ठिबक संच बसविण्यापूर्वी शासनाची पूर्व परवानगी घेतली नसल्याचे कारण देवून १४०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना ठिबक पासून वंचित ठेवले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठिबक सिंचन अनुदान शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना त्या त्या वर्षात उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत राबविणे क्रमप्राप्त आहे. सन २०१६-१७ या वर्षामध्ये सातारा जिल्ह्यासाठी रुपये १०.४० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर अनुदानाच्या मर्यादेत ५९८३ पात्र अर्जदारांपैकी ४६७७ अर्जदारांना सूक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी पूर्वसंमती देण्यात आली. त्यापैकी प्रत्यक्षात सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या ४६६६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम आरटीजीएस द्वारे जमा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर शहरातील उड्डाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२१) * ४११६३ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर शहरातील उड्डाणपुलाचे काम मागील काही वर्षांपासून प्रलंबित असून त्यामुळे येथे वाहतुक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त उड्डाणपुलाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) उड्डाणपुलाचे काम रखडले आहे, हे खरे आहे.

पूर्वीच्या राज्यमार्ग ६० च्या शिरुर ते अहमदनगर ह्या रस्त्याच्या खाजगीकरणांतर्गत चौपदरीकरणाच्या प्रकल्पामध्ये अहमदनगर शहरात उड्डाणपुलाचे बांधकाम समाविष्ट होते. सदरील प्रकल्पामधून उड्डाणपुलाचे बांधकाम वगळण्यास महाराष्ट्र शासनाने जानेवारी, २०१८ मध्ये मान्यता दिली असून अहमदनगर शहरातील राष्ट्रीय महामार्ग ६१ (जुना २२२) वर उड्डाणपूल बांधण्यास भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणास ना-हरकत कळविली आहे.

उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी प्रकल्प अहवाल भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या दिल्ली मुख्यालयास मंजूरीसाठी सादर केला असून त्याच्या मान्यतेनंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन उड्डाणपुलाचे प्रत्यक्ष बांधकाम हाती घेण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अहमदनगर यांनी कळविले आहे.

-----------------

**बीड जिल्ह्यातील शेतकऱ्याने आत्महत्या केल्याबाबत**

**(२२) * ३८१२१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील शेतकरी प्रल्हाद टेकाळे यांची इनामी जमीन विक्री केल्याने सदर जमीन हस्तांतर (ट्रान्स्फर) करण्यासाठी उपजिल्हाधिकारी, बीड यांनी टेकाळे यांच्याकडे पैशांची मागणी केल्याने शेतकरी प्रल्हाद टेकाळे यांनी कार्यालयाबाहेर विष पिऊन आत्महत्या केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) श्री.सय्यद शफीक सय्यद हमजा या व्यक्तीने मौजे नागापूर (बु.) ता.जि.बीड येथील गट नं/सर्व्हे नं १०६ मधील क्षेत्र ०० हे. २० आर ही इनाम जमीन श्री.प्रल्हाद हरिभाऊ टेकाळे यांना विक्री करण्याची परवानगी दिनांक १३/०७/२०१६ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. त्यानुषंगाने उपजिल्हाधिकारी (भूसुधार), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी तहसिलदार, बीड यांच्याकडून अहवाल मागविला होता. सदर अहवाल तहसिलदार, बीड यांनी दिनांक १४/१२/२०१७ रोजी उपजिल्हाधिकारी (भूसुधार), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना सादर केला. त्यानुसार उपजिल्हाधिकारी (भूसुधार), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी दिनांक १६/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये श्री.सय्यद शफीक सय्यद हमजा यांची सदर इनाम जमीन श्री.प्रल्हाद हरिभाऊ टेकाळे यांना विक्री करण्यासंदर्भात पडताळणी प्रमाणपत्र/कृषिक प्रयोजनासाठी हस्तांतरण करण्याची परवानगी दिली होती.

तथापि, श्री.टेकाळे जे उक्त प्रकरणी खरेदीदार होते त्यांनी तहसिल कार्यालय बीडच्या आवारात दिनांक १४/१२/२०१७ रोजी दारुच्या नशेत विष प्राशन केले आणि उपचारादरम्यान त्यांचा दिनांक १७/१२/२०१७ रोजी मृत्यू झाला. त्यानुषंगाने शिवाजी नगर पोलीस स्टेशन, बीड येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

(२) उक्त प्रकरणी झालेल्या विलंबाची जबाबदारी निश्चित करुन संबंधिताविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, बीड यांना दिनांक १२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंत्यास लाच घेताना अटक केल्याबाबत

**(२३) * ४०७४५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता श्री.पद्माकर सुखदेवे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी (ACB) एक लाखाची लाच स्वीकारताना दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कल्याण, अंबरनाथ, मुरबाड व भिवंडी या तालुक्यात एमएमआरडीए अंतर्गत सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामात रुपये २०० कोटींचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले असून त्यामध्ये श्री.सुखदेवे, कार्यकारी अभियंता यांचा सहभाग असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.सुखदेवे यांनी निविदा प्रक्रियेत सर्वच अटीशर्तींना डावलून तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन स्वत:च्या फायद्यासाठी त्यांच्या मर्जीतील कंपन्यांना लाभ होईल अशी निविदा प्रक्रिया पूर्ण केली असल्याचा आरोप निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांनी केला असून त्यासंदर्भातील तक्रार लेखी निवेदनाद्वारे विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांचेकडे केल्यानुसार त्यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करुन निविदा प्रक्रिया संदर्भातील कागदपत्रे दाखविण्याबाबतची मागणी करुन देखील ठाणे जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर माहिती देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. निविदा प्रकरणी कोणतीही अनियमितता झाल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यासाठी समुह पध्दतीने विविध उपक्रम राबविण्याबाबत

**(२४) * ४०९९८ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यासाठी समुह पध्दतीने विविध उपक्रम राबविण्याकरिता क्लस्टर तयार केले जाणार असून त्यासाठी रुपये ११५० कोटींची तरतूद करण्यात आली असून या योजनेचा प्रारंभ यवतमाळ जिल्ह्यापासून करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्लस्टर उपक्रमाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच या उपक्रमांतर्गत कोणकोणत्या योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजना कार्यान्वित करुन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) या प्रकल्पांतर्गत सुमारे २० गावांच्या गट समूहामध्ये शेतीतील नापिकी वा अन्य समस्यांमुळे त्या गावांतील अत्यंत विपदाग्रस्त/असुरक्षित स्थितीत असणाऱ्या शेतकऱ्यांचे समुहगट तयार करून त्यांच्यासाठी उपजिविकेचे साधन निर्माण करणाऱ्या वैयक्तिक व सामुदायिक लाभाचे उप-प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. सदर उप-प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने शेती पुरक व्यवसाय सुरू करणे, सदर व्यवसायाकरिता बाजार साखळी विकसित करणे, शाश्वत शेतीला चालणा देणे, शेती आधारीत लघु व सुक्ष्म उद्योग निर्मिती, मृद व जलसंधारण कामे शेतकऱ्यांचे CMRC व FPO च्या माध्यमातून संघटन करणे, समुपदेशन, शिक्षण व दुर्धर आजांरासाठी सहाय्य इ. उपक्रम या योजनेंतर्गत राबविण्यात येणार आहेत.

(३) दिनांक ०४ जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये सदर योजना यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यात राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. PoCRA ही जागतिक बँक पुरस्कृत योजना विदर्भ व मराठवाड्यातील १४ जिल्हे व जळगांवसाठी मंजूर झाल्यामुळे सदर योजनेशी जोड घालण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यात तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये एवं निवासस्थाने बांधण्याबाबत

**(२५) * ३९३६० श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१४३८ ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ३० गावांमध्ये तसेच निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील १९ गावांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये एवं निवासस्थाने बांधण्याकरिता अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी अनुक्रमे दिनांक २८ मार्च, २०१६ व दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, नाशिक यांनी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावातील अधिकची माहिती शासनास प्राप्त झाली असून सदर कार्यालये-निवासस्थाने बांधण्याकरिता आवश्यक निधी व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी व माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये एवं निवासस्थाने बांधण्याकरिता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकांबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रस्तावाची सुरु असलेली छाननी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) निफाड तालुक्यातील १९ गावांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये एवं निवासस्थाने यांची नकाशे व अंदाजपत्रके तांत्रिक तपासणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आली आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मंजूरी मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

येवला तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी यांचे कार्यालय एवं निवासस्थान यांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अभिप्रायासाठी सादर करण्यात आला आहे.

-----------------

## मोजे कोथळी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील स्मशानभूमीच्या जागेची नोंद ७/१२ मध्ये करण्याबाबत

**(२६) * ४१०८१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोथळी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील बलुतेदार (कुंभार, परीट, आंबी, माळी, सुतार, जंगम) व जैन समाजाकरिता गट नं. २७१ (सि.स.नं.५८३) मधील ०.१८ पैकी प्रत्येकी ०.९ आर इतके क्षेत्र स्मशानभूमीकरिता वापरण्याची पिढ्यांपिढ्याची वहिवाट आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमिनीची नोंद ७/१२ पत्रकेवर नावे होण्याकरिता वारंवार मागणी करण्यात आली असून त्याबाबत कोथळी ग्रामसभा ठराव क्र. ८९ दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी करण्यात येऊन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठरावावर काय निर्णय घेण्यात आला व उपरोक्त स्मशानभूमीची नोंद ७/१२ पत्रकी घेण्याकरिता शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) मौजे कोथळी, ता.शिरोळ, जिल्हा कोल्हापूर येथे गट नं. २७१ (क्षेत्र ०-१८ हे.आर) याच्या गा.न.नं. ७/१२ मध्ये "मसणवाट सरकार" अशी नोंद असून सदर जमीन व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायत कोथळीकडे सुपुर्द करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) मौजे कोथळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील विषयांकित गट नं. २७१ मधील ०-१८ हे.आर पैकी प्रत्येकी ०-०९ हे.आर इतके क्षेत्र बलुतेदार (कुंभार, परीट, आंबी, माळी, सुतार, जंगम) व जैन समाजाच्या स्मशानभूमीसाठी देण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर जिल्हा परिषद यांचा अहवाल तसेच अन्य संबंधित विभागाकडील ना-हरकत दाखले प्राप्त करून घेऊन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २२ मधील तरतूदींनुसार विषयांकित क्षेत्र दफनभूमी/दहनभूमीसाठी अभिहस्तांकित करण्याचे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेस्तरावर संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायगाव व लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत

**(२७) * ४०६७४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरसीफाटा (ता.नायगाव, जि.नांदेड) तसेच पेनूर, गंगाबेट, मुल्लमानवाडी (ता.लोहा, जि.नांदेड) या भागातील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा होत असून तालुक्यातील संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) नांदेड जिल्ह्यात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी तालुकास्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. सदर पथकांमार्फत नांदेड जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१७ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ८३३ प्रकरणात दंडात्मक कार्यवाहीद्वारे रुपये १८०.४० लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून ९ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुलुंड (मुंबई) येथील चौधरी मोटार स्कूलने बनावट वाहन परवाने दिल्याबाबत

**(२८) * ४०४५० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या बनावट सही-शिक्क्यांसह ७०० स्मार्टकार्ड वाहन परवाना मुलुंडच्या (मुंबई) चौधरी मोटर स्कूलने दिले असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास ठाणे पोलिसांच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती बनावट वाहन परवाने किती किंमतीने वितरीत केले आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट सही-शिक्क्यांच्या अनुषंगाने वाहन परवाना वितरीत करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मुलुंड येथील चौधरी मोटार ड्रायव्हिंग स्कूल या ठिकाणी पोलीस विभागाव्दारे केलेल्या कारवाईत श्री.सुनील भीमराज चौधरी हे आरटीओ, पोलीस व महसूल इत्यादी शासकीय कार्यालयाचे शिक्के, बनावट मोटार ड्रायव्हिंग स्मार्ट कार्ड तयार करीत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्यावरुन दिनांक १६/०१/२०१८ रोजी श्रीनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गुन्हा रजि.नं. ०७/२०१८, भा.दं.वि. कलम १७१, ४०६, ४२०, ४६४, ४६७, ४६८, ४७१ दाखल करण्यात येवून श्री.सुनील भीमराज चौधरी यांना दिनांक १६/०१/२०१८ रोजी अटक करण्यात आलेली आहे. चौधरी मोटार ड्रायव्हिंग स्कूलचा परवाना सन २०११ मध्येच रद्द करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस विभागामार्फत अन्वेषणाधिन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सरगम चौक ते क्रांतिसिंह नाना पाटील चौक (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील रस्त्यावर दुभाजक बसविणेबाबत

**(२९) * ४०९६८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरगम चौक ते क्रांतिसिंह नाना पाटील चौक (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे विद्यार्थी व नागरिकांची मोठी रहदरी असून सदर रस्त्यावर दुभाजक नसल्यामुळे या क्षेत्रात वारंवार अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी दुभाजक बसविणेबाबत स्थानिक नागरीक व विविध सामाजिक संस्थानी शासनाकडे वारंवार मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सरगम चौक ते क्रांतिसिंह नाना पाटील चौकापर्यंत दुभाजक बसविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मोहोळ पंढरपूर आळंदी ह्या राष्ट्रीय महामार्ग ९६५ च्या पंढरपूर शहरातील प्रश्नांकित १.१० कि.मी. रस्त्यावर वारंवार अपघात होतात हे खरे नाही. तसेच सदर १.१० कि.मी. रस्त्यावर दुभाजक बनविणेबाबतची मागणी राष्ट्रीय महामार्ग विभागास प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे जयताळा (जि.नागपूर) येथील जमीन गैरव्यवहाराबाबत

**(३०) * ४१०३० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जयताळा (जि.नागपूर) खसरा क्र.११९-१२१/२, नगर भूमापन क्र. ६४० या दोन एकर जमीन व्यवहारांमध्ये मे.पायोनियर ग्रुप या कंपनीने बेकायदेशीर गैरव्यवहार करुन शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी संबंधित जमीन मालकांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जमीन व्यवहारात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कंपनी व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करुन संबंधित जमीन मालकांना न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

श्री.दत्तात्रय कृ. पितळे, तक्रारदार व इतर यांनी मौजे जयताळा (जि.नागपूर) खसरा क्र. ११९ व १२१/२ न.भू.क्र. ६४० आराजी ०.८१ हे.आर (८१०० चौ.मी.) पैकी ७६१३ चौ.मी. जमीन मे.पायोनियर ग्रुप यांना विक्री केली.

सदर विक्रीच्या अनुषंगाने नगर भूमापन अधिकारी क्र. ३ यांनी पारित केलेल्या आदेशाविरुध्द श्री.दत्तात्रय कृ.पितळे व इतर यांनी जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांच्याकडे महसूली अपिल क्र.१५९/२०१५-१६ दाखल केले आहे. जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांनी सदर अपिल अर्जावर निर्णय होईपर्यंत आखीव पत्रिकेवरील परिस्थिती 'जैसे थे' स्थिती ठेवण्याबाबत नगर भूमापन अधिकारी क्र. ३ यांना दिनांक २०/०५/२०१७ रोजीच्या निर्णयान्वये आदेशित केले आहे.

सदर आदेशाविरुध्द मे.पायोनियर ग्रुप यांनी दाखल केलेल्या फेरतपासणी अर्जाबाबत उपसंचालक, भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर यांचेकडे कार्यवाही सुरु आहे.

मौजे जयताळा (जि.नागपूर) खसरा क्र.११९ व १२१/२, नगर भुमापन क्र. ६४० या दोन एकर जमिनीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्याचे विभाजन करण्याबाबत

**(३१) * ४१००७ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अहमदनगर जिल्ह्याचे विभाजन करुन शिर्डी हा नविन जिल्हा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्याने निर्माण होणाऱ्या शिर्डी जिल्ह्याचे मुख्यालय श्रीरामपूरला ठेवण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) जिल्हा विभाजनाबाबत निकष ठरविण्याकरीता शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याच्यादृष्टीने कार्यवाही सुरु आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या निकषानुसार अहमदनगर जिल्ह्यासह अन्य जिल्ह्याचे विभाजन/पुनर्रचनेबाबत प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक-पुणे रेल्वेमार्गासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(३२) * ३९३६४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक-पुणे रेल्वेमार्गासाठी राज्य शासनाच्या ५० टक्के हिश्श्याच्या रकमेची आगामी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी तसेच दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या ५० टक्के सहभागाची तरतूद करण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) होय.

(२) पुणे-नाशिक रेल्वेमार्गाची प्रकल्पाची एकूण किंमत रुपये १८९९.६४ कोटी असून त्यातील राज्य शासनाचा सहभाग ५० टक्के म्हणजेच रुपये ९४९.८२ कोटी (रोखीने) देण्याचा तसेच उर्वरित ५० टक्के आर्थिक सहभाग राज्य शासनाकडून टप्प्याटप्प्याने देण्याचा निर्णय शासन निर्णय क्रमांक आरएलवाय-०२१२/१८०/प्र.क्र.३७/परिवहन-५, दिनांक ७ जून, २०१२ अन्वये घेण्यात आला आहे. तसेच हा प्रकल्प महाराष्ट्र रेल्वे पायाभूत विकास लि. मार्फत राबविण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्याबाईनगर (ता.अर्धापूर, जि.नांदेड) भागातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत देण्याबाबत

**(३३) * ४०६७६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्याबाईनगर (ता.अर्धापूर, जि.नांदेड) भागात राहणाऱ्या शेतकऱ्याने सततची नापीक जमीन तसेच बँकेच्या कर्जाला कंटाळून घरातच गळफास घेऊन दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच, शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) सदर आत्महत्या दिनांक २७/०१/२०१८ रोजी केली आहे.

(२) शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये प्रकरण शासन निकषात बसत असल्याने जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविले असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास रुपये १ लक्ष मदत देण्यात आली आहे. तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.११९/म-७, (भाग-१), दिनांक २४/०७/२०१५ अन्वये शासनाच्या विविध विभागांमार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रात अवकाळी पाऊस व गारपीटमुळे नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(३४) * ४०८९४ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटमुळे पाच जणांचा मृत्यू होऊन शेतीचे नुकसान झाल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत तसेच, मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट, पूर, वीज कोसळणे इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रामध्ये सुमारे २० व्यक्तींचा मृत्यू झाला असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

सदर मृत व्यक्तींच्या वारसांना शासन निर्णय दिनांक १३ मे, २०१५ नुसार प्रत्येकी ४ लक्ष रुपये प्रमाणे मदत वाटप करण्यात आली आहे. तसेच, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहोळ-पंढरपूर-पुणे पालखी महामार्गाबाबत

**(३५) * ४०९८० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर व आळंदी ही दोन महत्वाची तीर्थक्षेत्रे पालखी मार्गाद्वारे जोडण्याचे शासनाने नियोजन असून या पालखी मार्गाचा ऑनलाईन उपग्रहाद्वारे आराखडा तयार करून भूसंपादनाविषयी जाहीर सूचना शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्ष ताबा रेषा आखणी करिता आलेल्या कर्मचाऱ्याकडून करण्यात आलेल्या खुणाने बाधित होणारे क्षेत्र व राष्ट्रीय महामार्ग विभागाने संपादन केलेले क्षेत्र यामध्ये तफावत आहे असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महामार्गातून नवीन बायपास रोड तयार करून शेतकऱ्यांची सुपीक जमीन मोठ्या प्रमाणात संपादित केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास प्रत्यक्ष राष्ट्रीय महामार्गाने संपादित केलेल्या जमीन व्यतिरिक्त जास्त जमीन संपादन न करणे व बायपास रोड पूर्वीच्या बायपास रोडने करणे याबाबत शेतकऱ्यांकडून मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालखी मार्गात राष्ट्रीय महामार्गाने संपादित केलेल्या जमिनीव्यतिरिक्त इतर जमीन न संपादित करता जुन्या बायपास मार्गे रस्ता करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) मोहोळ ते पुणे ह्या २६४ कि.मी. राष्ट्रीय महामार्ग ९६५ मध्ये पंढरपूर ते आळंदी हा पालखी मार्ग समाविष्ट आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून रा.म. ९६५ च्या चौपदरीकरणासाठी प्रकल्प सल्लागारामार्फत नकाशे व आराखडे आय.आर.सी. मानके व मार्गदर्शक सूचना यांचेनुसार करण्यात आले असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) हे खरे नाही. भूसंपादनासाठी संयुक्त मोजणी प्रगतीपथावर असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) सदरील प्रकल्पांतर्गत पंढरपूर माळशिरस, नातेपुते, फलटण, लोणंद, निरा, जेजुरी व सासवड हया शहरांसाठी बाहयवळण रस्ते प्रस्तावित करण्यात आलेले असून बाहयवळण रस्त्यांसाठी ४५ मी. रुंदीत भूसंपादन करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(४) अश्या आशयाचे निवेदन प्राप्त नाही. तथापि, जास्तीत जास्त ठिकाणी अस्तित्वातील रस्त्याचा वापर करण्याचा प्रयत्न केला असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(५) रस्त्याची आय.आर.सी. मानकाप्रमाणे भौमितीक सुधारणा, गावांमध्ये होणारी वाहतूक कोंडी व भविष्यातील पालखी मार्गाची वाहतूक वर्दळ विचारात घेऊन रस्त्याची आखणी करण्यात आलेली आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.